भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

( सकाळ )

जा.क्र.२४४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०४/२०१७

**१) तरुणीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २४/०३/२०१७ चे १२.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच कॉलेज मध्ये शिक्षण घेत असुन फिर्यादी सोबत आरोपी हा जबरदस्तीने बोलण्याचा प्रयत्न करीत होता फिर्यादी ही पेपर देवुन बसस्टॉप कडे रोडनी येत असतांना यातील आरोपीने फिर्यादीचे मागेमागे बसस्टॉप वर येवुन फिर्यादीचा हात पकडुन जबरदस्तीने सॅनसुई कंपनीचा मोबाईल दिले असता फिर्यादीने मोबाईल घेण्यास नकार दिल्याने तिच्या गालावर थापड मारुन मोबाईल दिला व तु जर कोणाला सांगीतली तर तुला जिवाने मारीन अशी धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४(ड),१,३२३,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

**२) विवाहीतेचा शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १४/०२/२०१३ ते आज पर्यत यातील चारही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीला माहेरुन काहीच आनले नाही या कारणावरुन शारीरीक व मानसीक त्रास देवुन धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४९८(अ),५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

**३) घराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन सोन्या, चांदीचे साहित्याची व नगदी पैश्याची चोरी . :—**

दिनांक ०२/०४/२०१७ चे ०९.००ते २१.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी लवकुश रामाजी लांजेवार वय ५७ वर्ष, रा. साहु लेआऊट ब्रॉस रेसींडेन्सी जवळ राजीव गांधी वार्ड भंडारा हे आपल्या पत्नी सोबत मुली कडे नागपुर येथे घराचे दार बंद करुन गेले होते कोणीतरी अज्ञात चोराने कुणी नसल्याची संधी साधुन घराचे मागील दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करुन घरातील गोदरेज आलमारीत ठेवलेला १ सोन्याचा मंगळसुत्र वजन १.५ ग्रॅम, १ सोन्याची अंगठी वजन ०६ ग्रॅम, ३ जोळ कानातील टॉप्स वजन ०६ ग्रॅम, ३ जोळ कानातील टॉप्स वजन १ तोळा, चांदीचा हळदी कुंकवाचा करंडा वजन ५ तोळे व नगदी १४,०००/—रु. असा एकुण ७३,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

**४) एसटी बस चालकांच्या निष्काळजीपणामुळे दोघांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०३/०४/२०१७ चे ०७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी चे काका शंभुसींग हे आपल्या एक्टीव्हा मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु ०८१३ ने पत्नी सौ. रिता सिंग सह भावाचे घरा कडुन खात रोडने शितला माता मंदीरा कडे तसेच फिर्यादी हे चुलत बहीनी शिल्पासह वेगळया मोटार सायकल ने येत असतांना मागेहुन येणाऱ्या आरोपी एसटी बस चालकाने आपल्या ताब्यातील वाहन निष्काळीपणे बेदरकारपने चालवुन एसटी बस चा मागील भाग फिर्यादीचे काकाचे मोटार सायकल ला मारल्याने फिर्यादीचा काका व काकु यांना जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी अमीत धर्मेंद्र सिंग वय ३७ वर्ष, रा. आनंद नगर खोकरला यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४,१३४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

**५) जमीनीचे खोटे कागदपत्र बॅकेत सादर करुन क्रॉफ्टलोन घेवुन बॅकेची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/११/२०१६ ते आज पावेतो यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने अर्जदार हरीचंद्र उपाशा हिंगे रा. रायपुर यांचे नावे आयसीआयसीआय बॅक भंडारा येथे खाते उघडुन अर्जदाराचे व जमीनीचे खोटे कागदपत्र बॅकेत सादर करुन ४,५७,४७९.८४/—रु. क्रॉफ्टलोन ची उचल करुन फसवणुक केल्याने चौकशी अहवाला वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४६४,४६७,४७१,४२० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी• चाबुकस्वार पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे•

**६) संगनमत करुन सहकारी पतसंस्थेचे गैर व्यवहार करुन संस्थेची चुकीचे देयक विड्रा करुन संस्थेची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/०४/२०१७ चे ३१/०३/२०१६ यातील आरेपी क्र. १ ते ४ हे अक्षय नागरी सहकारी पथसंस्थेचे पदाधीकारी असुन आरोपी क्र. ५ हा व्यवस्थापक व आरोपी क्र. ६ व ७ हे बचत अभीकर्ता आहेत आणी आरोपी क्र. ८ हा संगणक आपरेटर आहे. या सर्व आरोपीतांनी संगनमत करुन संस्थेमध्ये नियम बाहय गैर व्यवहार करुन संस्थेच्या संगणका मध्ये फेरफार करुन व चुकीचे देयक विड्राल देवुन एकुण ३३ लाख ९९ हजार ३७० रुपये रकमेचा अपहार करुन संस्थेची फसवणुक केली आहे. असे जिल्हा विशेष परीक्षक वर्ग १ सहकारी संस्था भंडारा यांनी केलेल्या चाचणी परीक्षणा वरुन उघडकीस आल्याने फिर्यादी श्रीकांत श्रीधर सुधे वय ५४ वर्ष, रा. भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४०८,४०९,४७७(अ),४२०,३४ भादंवि. सहकलम ६६ड माहीती तंत्रज्ञान कायदा सन २००० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. चकाटे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**७) क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन लाकडी सेट्रींगचे पाठीवर मारुन जखमी केले जिवाने मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक ०२/०४/२०१७ चे २२.०० वा. दरम्यान यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस व तिचे पती आमचे घरी राहु नकोस बाहेर कोठेही निघुन जा असे म्हणुन भांडण करुन फिर्यादीस काठीने व लाथाबुक्यांनी पाठीवर मारपीट केले व तिचे पती कुलदीप रामटेके यांचे डोक्यांवर, मांडीवर व पाठीवर सेट्रींगचे लाकडी पट्टीने मारुन जखमी केले व शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहे.

**८) टाटा सुमो गाडीचा टायर फुटुन वाहन पलटी झाल्याने इसमास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०३/०४/२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी रवीद्र नंदलाला येळे वय २० वर्ष, रा. गोंडमोहाडी तिरोडा जि. गोंदीया हा जखमी ६ ते ८ इसमासह बाबाजुमदेवजीचे कार्यक्रमा करीता टाटा सुमोने नागपुर येथे जात असता टाटा सुमोचा मागील डावे बाजु कडील टायर फुटल्याने यातील आरोपी वाहन हयगयीने लापरवाहीने चालवुन टाटा सुमो गाडी अनीयंत्रीत होवुन पलटी झाल्याने गाडीत बसणारे ८ इसम गंभिर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहे.

**९) अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०३/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, करडी, वरठी, तुमसर,सिहोरा, आंधळगाव, गोबरवाही, पवनी, अडयाळ, लाखांदुर व भंडारा येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण १५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १२८लिटर हातभट्टी दारु+ ५०० किलो सडवा+ साहीत्य किंमती ३८२००/—रु. १२ लिटर ९६० मिली लिटर देशी दारु किंमती ३,६००/—रु. तसेच जुगारातुन किंमती ५६५/—रु. असा एकुण किंमती ४२,३६५/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.